بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ    نَحْمَدُہٗ وَنُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ    وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# जलसा सालाना (वार्षिक सम्मेलन) ब्रिटेन २०२३ बाबतीत ईश्वरीय कृपावर्षांचा श्रद्धावर्धक अवलोकन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ४ ऑगस्ट २०२३, मशिद बैतुल फुतूह, लंडन

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

अलहमदुलिल्लाह! सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने, जमाअत अहमदिया यू.के.चा वार्षिक सम्मेलन गेल्या शुक्रवार ते रविवारपर्यंत यशस्वीपणे पार पडला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उपस्थितीही प्रचंड होती, यासाठी अल्लाहचे कितीही आभार मानले तरी कमीच आहे. अल्लाहची कृपा आहे की त्याने हा सम्मेलन अनंत आशीर्वादांनी भरला.

आम्ही कमकुवत आहोत आणि आमचे सर्व काम अल्लाहच्या कृपेने होत आहेत. अहमदिया जमाअत तर दररोज परमेश्वराच्या या शब्दांना बारकाईने पाहते की, ''जर तुम्ही अल्लाहचे आशीर्वाद मोजत बसतील तर (ते इतके पुष्कळ आहेत) तुम्ही त्याची गणना करू शकणार नाही.''

म्हणून कृतज्ञता तर आमचे कर्तव्य आहे. अल्लाहच्या आशीर्वादांपुढे नतमस्तक राहणे हे आपले कर्तव्य आहे. जोपर्यंत आम्ही हे कर्तव्य बजावत राहीन, तोपर्यंत इन्शाल्लह आम्ही प्रगतीशील राहू. म्हणून प्रशासन मंडळ आणि सम्मेलनातील सामील होणाऱ्यांनी अल्लाहचे आभार मानले पाहिजे.

आता मला कार्यकर्त्यांचेही आभार मानायचे आहेत. सर्व कार्यकर्त्यांनी आपले कर्तव्य चोख बजावले. हसतमुखाने त्यांनी आपापली भूमिका बजावली. जेवणाच्या व्यवस्थापनात लजनाकडून जी तक्रार असायची ती यावेळी जवळपास उद्भवली नाही. तसेच वाहतूक, स्वयंपाक, रोटी प्लांट, सुरक्षा, स्वच्छता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एम.टी.ए, ज्याने एका नवीन प्रकारे जगाला या सम्मेलनाशी जोडले, या सर्वांनी चांगली कामगिरी केली. ज्या विभागांची नावे घेतली गेली किंवा राहिली आहे त्यासर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

या वार्षिक सम्मेलनाबाबत अभ्यागतांपैकी बिगर अहमदींनी व्यक्त केलेली काहीं प्रतिक्रिया मी आता नमूद करेन.

बुर्किना फासो येथील प्रख्यात नेत्रचिकित्सक म्हणाले की, एका धार्मिक नेत्याभोवती, एक समान उद्देशासाठी हजारो लोक एकाच ठिकाणी जमलेले आहेत. अशी सुव्यवस्थित आणि विस्तृत व्यवस्थापन माझ्यासाठी आश्चर्यकारक आहे.

अमेरिकेतील एक प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ, जे प्रोफेसर आहेत. ते म्हणाले, जगभरात अशा अनेक मेळाव्यांचा मी स्वतः आयोजक राहिलो आहे जिथे नोंदणी प्रक्रिया कार्यरत असते; पण वार्षिक सम्मेलनात नोंदणी करण्याची जी प्रक्रिया होती ती इतकी शिस्तबद्ध होती की ती पाहून मी स्तब्ध झालो.

बेलीझमधील एका शहराचे महापौर आले होते. त्यांनी सांगितले की त्यांनी त्यांच्या आयुष्यात असे शांत लोक पाहिले नाहीत. मी येथे पाहिलेले अध्यात्म आणि बंधुत्वाचे वातावरण माझ्यासाठी अनन्यसाधारण आहे.

इंडोनेशियाचे माजी धार्मिक व्यवहार मंत्री म्हणतात की विमानतळावरून ते सम्मेलनास्थळापर्यंत मी कायम तुमचे घोषवाक्य ‘‘प्रेम सर्वांसाठी तिरस्कार कोणाचाही नाही’’ पाहत राहिलो.

गॅम्बियाचे माहिती मंत्री या बैठकीला उपस्थित होते. ते म्हणतात की वार्षिक सभेच्या सर्व व्यवस्थेमुळे ते खूप प्रभावित झाले आहेत. एवढ्या मोठ्या मंडळीत भांडण झाल्याची एकही घटना समोर आली नाही. मला आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे जमाअतच्या सदस्यांचे त्यांच्या इमामाबद्दलचे प्रेम व स्नेह, अतुलनीय आहे.

ब्राझीलच्या प्रतिनिधीने म्हणाले की, ११८ देशांतील लोक बंधुभावाने एकत्र जमणे ही काही गंमत नाही. सर्वांचा एकमेकाशी शिष्टाचार, करुणा, स्नेह आणि आदराने भेटणे हे मला खूप आवडले. पाहुण्यांसाठी वाहतुकीची उत्तम व्यवस्था होती.

स्पॅनिश शिष्टमंडळात समाविष्ट असलेले एक गृहस्थ, जे व्यवसायाने इतिहासकार आहेत, म्हणाले की, आजच्या युगात अहमदिया जमाअतने जिद्द, धैर्य आणि संघर्षाचे व्यावहारिक उदाहरण प्रस्थापित केले आहे.

एका इटालियन पत्रकाराने सांगितले की, जलसा सालानाबद्दल मी यापूर्वी वाचले होते. पण येथे सामील होणे हा विलक्षण अनुभव होता. मी सभेत पाहिलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नमाज़(प्रार्थना) होती.

सेनेगलमधील एका प्रदेशाचे गव्हर्नर म्हणतात, ‘‘मी अशा परस्पर प्रेमाचे दुसरे उदाहरण कधीच पाहिले नाही.’’ अपेक्षित मसीह (अ.स.) च्या उद्धृतांचा माझ्यावर खूप प्रभाव पडला. सम्मेलनामध्ये प्रत्येकजण स्वतःपेक्षा इतरांना प्राधान्य देत होता.

कोलंबियाहून आलेला एक पाहुणा सांगतो की शांततापूर्ण वातावरण, बंधुभाव, प्रेम, खलिफाची प्रबोधनपर भाषणे आणि लोकांना पाहून मी खूप प्रभावित झालो.

तीन लोक चिलीहून आले होते, ते एका ख्रिश्चन संघटनेचे प्रतिनिधी होते. त्यापैकी एकाने सांगितले की, तुमची जमाअत शरीरासारखी आहे, खलिफा या शरीराचे डोके

आणि मेंदू तर बाकी जमाअत शरीराच्या अवयवांसारखी आहे, जे मनाच्या संकेत आणि निर्देशांनुसार कार्य करत आहे.

स्पेनमधील एक मिशनरी मित्र म्हणतो की या सम्मेलनमध्ये मला राजांपेक्षाही उत्तम वागणूक मिळाली. ४०,००० हून अधिक पाहुण्यांसाठी अहमदी स्वयंसेवकांची अथक सेवा हा एक चमत्कार आहे. खचितच या सम्मेलनाच्या माध्यमाने मी ईश्वराशी जुडलो.

कॅनडाचे एक सांसद म्हणाले की, सम्मेलनाला येणे ही माझ्यासाठी खूप छान गोष्ट होती. हा सम्मेलन धर्माशी एकनिष्ठ राहण्याची आणि स्वेच्छेने काम करण्याची शिकवण पुरवतो.

काही छापखान्याचे मालक तुर्कीहून आले होते. एका प्रमुखाचे म्हणणे होते की, तुम्ही ज्या कौशल्याने एवढा मोठा मेळावा आयोजित केलात ते माझ्यासाठी आश्चर्यकारक आहे. पुढे म्हणाले, की मला आश्चर्य वाटणारी आणखी एक गोष्ट म्हणजे मी कोणालाही धूम्रपान करताना पाहिले नाही.

लॅटव्हियातील एका सामाजिक कार्यकर्त्याचे म्हणणे आहे की, या बैठकीमुळे मला इस्लामविषयी जाणून घेण्याची संधी मिळाली. मी परत जाऊन पवित्र कुरआनचा अभ्यास करेन आणि माझे ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न करेन.

टेलिव्हिजनवर सम्मेलन पाहणाऱ्या लोकांचे काहीं प्रतिक्रिया आहेत.

काँगो ब्राझाव्हिल येथील आमच्या प्रचारकाने लिहिले की एका ख्रिस्ती मित्राला सम्मेलन पाहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. समारोपीय भाषण ऐकल्यानंतर ते म्हणाले की, जगातील प्रत्येक सरकारने जर या शिकवणीचे पालन करण्यास सुरुवात केली, तर जगातील गरिबी पूर्णतः नाहीशी झाली नसली, तरी जगात किमान कोणीही रात्री उपाशी झोपणार नाही. इस्लामच्या खलिफांनी ज्याप्रमाणे आपल्या प्रजेचा विचार केला, त्याचप्रमाणे आपले नेतेही विचार करू लागले तर आपले जग स्वर्ग होईल.

आइसलँडमधील एक जागतिक शांतता मिशनरी म्हणतात की, मी भेटलेल्या जमाअतच्या तमाम सदस्यांमध्ये सौम्य, विनम्र, सेवा करण्यास सदैव तत्पर आणि अतिशय आदरातिथ्य गुण जाणवले. राहण्याची व्यवस्था खूप चांगली होती.

हैटीच्या ज्युडिशियरी पोलिसांचे प्रतिनिधी म्हणाले की, ख्रिश्चन असूनही अहमदिया मुस्लिम जमाअतच्या सभेत सहभागी होऊन मला धर्माविषयी खूप काही शिकण्याची संधी मिळाली.

हुजूर अनवर म्हणाले की अल्लाहच्या कृपेने अशा प्रकारचे असंख्य मतं, प्रतिक्रिया, टिप्पण्या प्राप्त झाले आहेत. अल्लाह करो की, या सम्मेलनाचे परिणाम अहमदियांचे जीवन अल्लाहशी कायमचे जोडण्यात सहाय्यभूत होवो. त्यांच्या विश्वास आणि श्रद्धेत वाढ होवो आणि हजरत अपेक्षित मसीहांच्या उद्देशांचे पूर्ती करणारे होवो.

त्याचप्रमाणे बिगर अहमदींवरही याचे तात्पुरते परिणाम न होता शाश्वत परिणाम होवो.

या वार्षिक सम्मेलनाचे कार्यक्रम प्रसारमाध्यमांद्वारे पाहिले आणि ऐकले गेले. आफ्रिकेतील चोवीस टीव्ही चॅनेलने माझी संपूर्ण भाषणे दाखवली आणि अशा प्रकारे चाळीस लाखांहून अधिक लोकांनी ही भाषणे ऐकली. पत्रकारांसाठी मीडिया सेंटर बांधण्यात आले. जिथे तेवीस माध्यम प्रतिनिधी आणि पत्रकारांनी कार्यवाही पाहिले आणि अशा प्रकारे ते दैनंदिन अहवाल तयार करत राहिले.

एकूण ७२ मीडिया रिपोर्ट्स तयार केले गेले, जे पन्नास दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचले. एकेचाळीस संकेतस्थळांवर ही बातमी प्रसारित झाली. सम्मलनाबाबत पंधरा लेख वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले. वेगवेगळ्या टीव्ही चॅनल्सवर चौदा बातम्या प्रसारित झाल्या. रेडिओ स्टेशनवर ३७ बातम्या प्रसारित केल्या.

तर सर्वशक्तिमान अल्लाहने या सम्मेलनाला प्रत्येक बाबतीत आशीर्वाद प्रदान केले. अल्लाह आम्हां सर्वांना विनम्र होऊन त्याची कृतज्ञता बजावण्याचे आणि सत्कर्म करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ.

عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ.